माहितीचा
अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
## प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ९७१/२०२२**

**अपिलार्थी, श्री. मनोज नामदेव शेंडे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता-२ (पश्चिम),**
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सांस्कृतिक संकुल, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर-३३

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (पश्चिम),**
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सांस्कृतिक संकुल, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर-३३

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७.०८.२०२४**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०१.११.२०२१ | ११.११.२०२१ | ०७.१२.२०२१ | १०.०१.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ०१.११.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "जानेवारी २०१२ ते ऑक्टोबर २०२१ या कालावधीतील मौजा-जामठा खसरा नं. २४८ राधा माधव डेव्हलपर्स यांचे जामठा स्थित वृंदावन सिटी येथील प्लॉट क्रं. ५ येथे बांधकाम झालेल्या सुदामा बिल्डींग क्र.१ ते ८ मधील एकूण सदनिका तसेच सुदामा रो-हाऊसमधील एकूण रो-हाऊसेसला नागपूर सुधार प्रन्यास/नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण/नागपूर महानगर पालिका यांचेकडून पुरविण्यात आलेल्या Occupation Certificate and Completion Certificate ची प्रत " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, आपण अपेक्षिलेली राधा माधव डेव्हलपर्स यांचे मौजा-जामठा स्थित वृंदावन सिटी येथील भु.क्र.५ बाबत माहिती कार्यालयाचे अभिलेखात उपलब्ध असून सदर भुखंडावरील ब्लॉक क्र. ८ (बी) मधील ३२ गाळे (Flat) व तळमजल्यावरील समुह गृह बांधणी (Group Housing) करिता

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★नागपूर★

कार्यालयातर्फे निर्गमित केलेली Occupation Certificate/Completion Certificate ची छायाप्रत सदर पत्रासोबत पुरविण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०७.१२.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "दिलेली माहिती अर्धवट व चुकीची आहे" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०.०१.२०२२ रोजी सुनावणी घेवून, अपिलार्थी दिनांक ११.११.२०२१ च्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांनी अंशत: माहिती दिल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ऑक्युपेशन सर्टीफिकेट/कम्पलीशन सर्टीफिकेटची माहिती आदेश प्राप्तीपासून १५ दिवसाचे मुदतीत निशुल्क प्रदान करावी. अपिलार्थीस आवश्यक असल्यास धारीकेचे निरीक्षणाकरीता अभिलेख उपलब्ध करुन देण्यात यावा, असे आदेशित करुन अपील निकाली काढले आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२.०१.२०२२ रोजी अपिलार्थीस ३० पानांची माहिती पुरविली आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०६.०४.२०२२ रोजी** " माहितीचा अधिकाराअंतर्गत मिळालेली माहिती भ्रामक, अपुर्ण व सदोष आहे " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक ०८.०४.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर दिनांक २४.०६.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. मात्र त्यावेळी सुनावणीची कार्यवाही पुर्ण होऊ न शकल्याने त्यावर आज दिनांक ०७.०८.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता-२, श्री. एच.ए. माहुले व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (पश्चिम), श्री. संदिप राऊत हे ऑनलाईन पध्दतीने सुनावणीस उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी श्री. मनोज नामदेव शेंडे यांनी दाखल केलेल्या दिनांक ०१.११.२०२१ रोजीच्या जोडपत्र-अ नुसार मौजा खसरा जामठा-२४८ राधा माधव डेव्हलपर्स यांचे जामठा स्थित वृंदावन सिटी येथील प्लॉट क्रं. ५ येथे बांधकाम झालेल्या सुदामा बिल्डींग क्र.१ ते ८ मधील एकूण सदनिका तसेच सुदामा रो-हाऊसमधील एकूण रो-हाऊसेसला नागपूर सुधार प्रन्यास/नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण/नागपूर महानगर पालिका यांचेकडून पुरविण्यात आलेल्या Occupation Certificate and Completion Certificate

ची प्रत मिळण्यासाठी अर्ज केला असून वरील सर्व कागदपत्रे लवकरात लवकर देण्याविषयी नमूद केले आहे. प्रस्तूत प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता-२ विभागीय कार्यालय (पश्चिम), ना.म.प्र.वि.प्रा. नागपूर, श्री. एच.ए. माहुले यांनी वृंदावन सिटी येथील भु.क्र.५ बाबत माहिती कार्यालयाचे अभिलेखात उपलब्ध असून सदर भुखंडावरील ब्लॉक क्र. ८ (बी) मधील ३२ गाळे (Flat) व तळमजल्यावरील समुह गृह बांधणी (Group Housing) करिता कार्यालयातर्फे निर्गमित केलेली Occupation Certificate/Completion Certificate ची छायाप्रत पुरविण्यात येत असल्याचे दिनांक ११.११.२०२१ रोजी नमूद केले आहे. अपिलार्थी श्री. शेंडे यांनी याविरुध्द दिनांक ०७.१२.२०२१ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला असून यात ५०,००० चौरस मिटरचे अवैध बांधकाम केले असून प्रस्तूत प्रकल्पाविरुध्द National Green Tribunal, Pune आणि मा. सर्वोच्च न्यायालय येथे याचिका प्रलंबित असून देण्यात आलेली माहिती ही अपुर्ण असल्याचे नमूद केले आहे. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक अभियंता (पश्चिम) श्री. अविनाश प्र. बडगे यांनी दिनांक १०.०१.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशात जन माहिती अधिकारी यांनी अंशत: माहिती दिलेली असल्याचे नमूद करीत अपिलार्थीस आवश्यक ऑक्युपेशन सर्टीफिकेट/कम्पलीशन सर्टीफिकेटची माहिती आदेश प्राप्तीपासून १५ दिवसाचे मुदतीत निशुल्क प्रदान करावी. अपिलार्थीस आवश्यक असल्यास धारीकेचे निरीक्षणाकरीता अभिलेख उपलब्ध करुन देण्यात यावा, असे आदेशित करुन अपील निकाली काढले आहे. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२.०१.२०२२ रोजी अपिलार्थीस ३० पृष्ठांची माहिती कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती विनामुल्य पुरविली असल्याचे आढळून येते. मात्र अपिलार्थी यांच्या म्हणण्यानुसार वरील माहिती देखील असमाधानकारक असून त्यांच्यासारख्या गाळेधारकांनी विविध न्यायीक व अर्धन्यायीक प्राधिकरणाकडे दाखल केलेल्या प्रकरणांमध्ये उपरोक्त माहितीची आवश्यकता असून प्राधिकरणाने यासंदर्भात सर्व कागदपत्रे प्रदान करावी, अशी विनंती केली आहे.

प्रस्तूत प्रकरणी कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती ही याअधीच देण्यात आलेली असल्याचे प्राधिकरणाच्या वतीने नमूद करण्यात आले असून यात अपिलार्थी यांनी त्यांच्या गाळयाचे चटई क्षेत्र (Carpet area) इत्यादींची माहिती अपेक्षित असून त्यासंदर्भात कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती देण्यात आलेली असल्याचे नमूद केले. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी याआधीच अपिलार्थी यांची इच्छा असल्यास संपुर्ण नस्तीचे अवलोकन करण्याचे निर्देश यापूर्वीच पारीत केले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) प्रमाणे कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती प्रदान करणे अपेक्षित असून जन माहिती अधिकारी यांनी नमूद केल्याप्रमाणे वरील प्रकरणाशी संबंधित माहिती



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

अपिलार्थी यांना याआधीच प्रदान केली असल्याचे नमूद केले आहे. तरी त्यांना अपेक्षित असलेली व विविध न्यायालये व न्यायाधिकारी यांचेकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणात लागणारी माहिती प्राप्त झाली नसल्याचा त्यांचा युक्तीवाद ऐकून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी याआधीच आदेश पारीत केले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या आदेशाप्रमाणे संबंधित वृंदावन सिटी येथील सुदामा बिल्डींग प्लॉट क्र.५ येथे बांधकाम झालेल्या सदनिका यासंदर्भात नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नागपूर येथील अभिलेखात उपलब्ध असलेली नस्ती/धारीका ही अपिलार्थी यांना पुढील ७ कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत अपिलार्थीस अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात यावी. त्यासाठी अपिलार्थी श्री. शेंडे यांनी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचेशी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत, संपर्क व समन्वय साधून अवलोकन प्राप्त करुन घ्यावे. सदर अवलोकन करतेवेळी कार्यालयीन कामकाजात हस्तक्षेप होणार नाही, याची खातरजमा बाळगून तसेच मुळ नस्तीला कुठलीही हानी पोहचणार नाही, याची काळजी घेत उपरोक्त अवलोकन प्राप्त करुन द्यावे व यात यापूर्वी प्रदान केलेल्या माहिती व्यतिरिक्त अपिलार्थीस माहिती हवी असल्यास ५० पृष्ठांपर्यंतची माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामुल्य प्रदान करण्यात यावी. उर्वरित पृष्ठांकरीता शुल्क आकारावेत, या निर्देशासह प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**उपरोक्त आदेशानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर * नागपूर *

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०७.०८.२०२४**

जावक क्रमांक 8884 दिनांक 5 SEP 2024